REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# शोषितांच्या आत्मिक उत्थानाची लोक चळवळ उभारणारा लोकनेता

डॉ. राजेंद्र ल. सलालकर
विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कोल्हार ता. राहाता, जि. अहमनदगर.

।।१।।

एखाद्या व्यक्तीने काय काम केले यापेक्षा त्याने ते कोणत्या परिस्थितीत केले हे जास्त महत्वाचे असते. सामान्य दैनंदिन जीवन जगताना रुढ वाटेने जाणे तसे अवघड नसते. त्याचवेळी समुहाच्या प्रवाहातील एक होऊन अस्तित्वहीन चालत राहण्याने वेगळेपणही जाणवणारे नसते. अर्थात ही गोष्ट व्यापक जीवन प्रवाहात कळणारीही नसते. माणूस हा समुहशील प्राणी असल्यामुळे त्याशिवाय तो राहू शकत नाही. म्हणनू वैयक्तिक जीवन आणि समुहजीवन यांची अपरिहार्यता असते. त्याच्या वैयक्तिक जीवनावर समुहजीवन प्रभाव गाजवीत असते. आणि विवक्षित वैयक्तिक जीवन समुहावर छाप पाडीत असते. त्यातूनच त्याला वेगळे अस्तित्व प्राप्त होऊन, समुह जीवनालाही वेगळेवळण देणारे असते. हे वळण विधायक असेल, तर इतिहास त्याची गौरवपूर्ण नोंद घेतो.

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी केलेल्या विधायक कार्याची इतिहासाने अशीच गौरवपूर्ण नोंद घेतली आहे. याचे कारण त्यांनी समुहजीवनापेक्षा वेगळ्या वाटेने चालून, समुहाला वेगळे विधायक वळण दिले. त्यातून समुहजीवन समृद्ध झाले आणि विठ्ठलरावांना वेगळी ओळख मिळाली.

सोळाव्या शतकात सुरु झालेल्या औद्योगिक क्रांतीने युरोपात नवी व्यवस्था स्थापित केली. मानवी जीवनात यंत्राच्या मदतीने आमुलाग्र बदल झाला. ऐहिक सुख-समृद्धीच्या अनेक कल्पना प्रत्यक्षात आल्या. माणसांच्या कर्तृत्वाला नवे घुमारे फुटू लागले. त्याचा बुद्धीवरचा विश्वास अहंकारापर्यंत चढू लागला याचा विसाव्या शतकात उच्चांक गाठला गेला. भांडवलाशाहीचा उदय हा त्याचाच आविष्कार होता आणि नवीन वर्ग व्यवस्था हे तिचे आपत्य होते. समाज या पार्श्वभूमीवर मार्क्सवादाचा जन्म झालार आणि समाजवादी रचनेची त्याला स्वप्ने पडू लागल्यानंतर एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात रशियात त्याला मूर्त रुप मिळाले. समाजवादाने शोषिथ बहुजनाच्या असण्याला अर्थ दिला. साधन संपत्तीच्या समान वाटपाच्या हक्काचा शत्काच्या अंतापर्यंत या विचारांचा स्पर्शही भारतीय मनाला झालेला नव्हता. भारतीय समाज पराभवाच्या धक्यातून अजूनही पुरेसा सावरलेला नव्हता.

१८०२ साली वसईचा तर झाला आणि १८१८ साली शनिवार वाड्यावरुन भगवा उतरवला जाऊन, तिथे युनियन जॅक फडकला. मोगलांच्या विरोधात मावळ्यांना एकत्र करुन १६४६ साली निर्मिलेले स्वराज्याचे स्फूलींग पेशव्यांनी पुढे अटकेपार नेले, तरी या सर्वांचा युरोपीय साम्राज्यवादापुढे निभाव लागला नाही. त्यामुळे भारतीय जीवन सरंजामदारी व्यवस्थेखाली शोषले जाऊ लागले. सर्वस्वी वैज्ञानिक साधनांनी युक्त शासनयंत्रणेपुढे रुढीग्रस्त भारतीय समाज हतबल झाला. अलौकिक भारतीय जीवन भौतिकवादापुढे फिके पडू लागले. आपण पराभूत, परावलंब, दुर्बल, मागासलेले आहोत; या न्यूनगंडाने पछाडले गेले. अशा परिस्थितीतही या विरोधात १८५७ साली बंड करण्याच प्रयत्न



केला; तरी ते शिपायांचेच बंड असल्याने अपयशी ठरले. बहुसंख्य भारतीय जीवन पराभूत मानसिकतेच्या गर्तेतच होते.

महाराष्ट्राचे चित्रही यापेक्षा वेगळे नव्हते. मुंबई इलाखा आणि हैद्राबादच्या निजामाच्या वर्चस्वाखाली महाराष्ट्रय जीवन विभागलेले होते. आगरकर, टिळक आदींनी महाराष्ट्रीय जीवनाला जागे करण्याचा प्रयत्न केला. मात्र तो प्रयत्‍ नही शहरी मूठभरांपर्यंतच मर्यादित राहिला. त्यांना व्यापक जनाधार लाभला नाही. आगरकरांचा कर्मठपुरोगामी विचार रुजणे कठीण, तर स्वराज्य मिळविण्याच्या हक्काची टिळकांची घोषणा शहरी सीमा ओलांडू शकली नाही. १९१५ साली महात्मा गांधी भारतात आले. भारतीय राजकारणात प्रवेश करण्यापूर्वी ना. गोखल्यांनी त्यांना भारत भ्रमण करण्यास सांगितले. यानंतर १९२१ साली म. गांधी काँग्रेसचे अध्यक्ष झाल्यानंतर नागपूरच्या कॉग्रेसेच्या अधिवेशनात एका वर्षात स्वराज्य मिळवून देण्याची घोषणा केली. ती त्यांना स्वत:लाच किती फोल होती हे एक वर्षानंतर लक्षात आले. त्याचे कारण ७०% लोकसंख्या खेड्यात राहत होती. आणि त्यांच्याशिवाय स्वराज्याच्या चळवळीला काहीच अर्थ नव्हता. या वेळचे खेड्यातील जीवन हे विकला हताश, पराभूत, न्यूनगंडाने पछाडलेले , रुढीग्रस्त, अंधश्रद्धाळू, शेतीवर पूर्णत: अवलंबून असलेले, शेती पावसावर निर्भर, त्यामुळे जीवनातील अनिश्चितता कायमची पुजलेली. एका बाजूला अनियमीत निसर्ग तर दुसऱ्या बाजूला सावकारशाही यात अडकलेली शेती. परंपरागत रुढीग्रस्त, अध्यात्मिक, अंधश्रद्धायुक्त समाज आणि त्याचत आधुनिक, वैज्ञानिक, भौतिकवादी संस्कृतीचे आक्रमण. एका बाजूला हरलेपणाची जाणीव तर दुसऱ्या बाजूला शासन यंत्रणेचे भयकारी शोषण, प्रतिकूल निसर्ग आणि परकिय सत्ता यात होणारा कोंडमारा. या पार्श्वभूमीवर विसाव्या शतकाच्या प्रारंभी विठ्ठलराव विखे पाटील यांचा लोणी सारख्या खेड्यात जन्म झाला.

अहमदनगर जिल्हा तसा कायम दुष्काळी, सह्याद्रीच्या छायेने अवर्षण कायमचे ठरलेले. कधी भरपूर पाऊस कर कधी अजिबाबत नाही. त्यामुळे पीक घेण्यासाठी सावकाराकडून कर्ज घेणे गरजेचे तर ते परतफेड करण्याची हमी देता येईलच असे नाही. त्यामुळे सावकारी विळखा कायम, तर दुसऱ्या बाजुला व्यापारी वर्गाकडून होणारे शोषण. पिकवलेल्या मालाला नक्की भाव मिळेलच याची शाश्वती नाही. याचा स्वत: विठ्ठलराव अनुभव घेत होते. आपल्या तरुणपणात या साऱ्या घटनांकडे ते उघड्या डोळ्यांनी पाहत होते. त्यातून त्यांच्या आंतरिक मनाला अस्वस्थता येत होती. परंतु यातून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नव्हता. विल्सन डॅमने अवर्षणावर काही प्रमाणात मात करता आली असली, तरी व्यापारी लुटीपुढे सारेच हतबल होते. अहोरात्र कष्ट उपसून पिकवलेला गूळ मातीमोल भावाने विकताना शेतकऱ्यांचे काळीज तुटत होते. त्याच्याच धक्का बसून लोणीचा लगड नावाचा शेतकरी मरण पावला. कर्ज परत करीत नाही म्हणून सावकार बेदरकार होऊन लुटमार करीत होते. त्याचाही प्रत्यक्ष अनुभव झरेकाठीच्या शेतकऱ्याच्या बाबतीत त्यांनी घेतला होता.

१८१८ साली नगर इलाख्यात फार मोठा दुष्काळ पडला होता. त्याचा लाभ उठवत लोभी सावकारांनी आडाणी व नडलेल्या शेतकऱ्यांच्या कित्येत जमिनी घशात घातल्या. या दुष्काळामुळे शेतकरी बांधवांची ससेहोलपट प्रत्यक्ष समोर बघताना विठ्ठलरावांचा ऐन तारुण्यातील आत्मा कळवळून गेला. परत हरवलेल्या आर्थिक कुचंबनेच्या दलदलीत फसलेल्या आपल्या शेतकरी बांधवांसाठी काहीतरी केले पाहिजे, हे त्यांना प्रकर्षाने वाटू लागले.

याच दरम्यान 'सेंट्रल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिस्टुटची स्थापना झाली. आणि १९१८ साली ''बॉम्बे प्रॉव्हिंशियल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्युट'' म्हणून सहकारी संघची स्थापना झाली. या सर्वांतून बाहेर पडायचे असेल तर एकट्या-दुकट्याने सुटे प्रयत्न करण्यात अर्थ नव्हता. या अस्मानी-सुलतानी संकटावर मात करण्यासाठी गावातल्या प्रत्येक माणसाला त्याचा पायावर उभे केले पाहिजे. हा विचार त्यांच्या मनात उगवला. त्याचेच पहिले पाऊल म्हणजे २३-१-१९२३ रोजी 'लोणी बुद्रुक सरकारी पतपेढी' ची स्थापना होय. एका वर्षात स्वराज्य मिळवून देतो अशी केलेली घोषणा फोल ठरल्यानंतर गांधीजींना खेड्याकडे गेल्याशिवाय गत्यंतर नाही याचा साक्षात्कार झाला. त्याच वेळी विठ्ठलराव खेड्यातील माणसाला त्याच्या अस्तित्वासाठी जागे करीत होते. हताश् होऊन, मोडून पडलेल्या पराभूत-शोषित माणसाच्या मनात सहकाराच्या उर्जेचे सिंचन करीत होते. या अरिष्टाला भेदण्यासाठी समुहशीलतेने प्रयत्न केले, तरच निश्चित काहीतरी करता येईल, असे त्यांना वाटत होते. परंतु सहज साध्य मात्र अजिबात नव्हते.

या सर्वांवर मात करायची असेल, तर इथल्या प्रत्येक माणसात आर्थिक क्षमता निर्माण व्हायला हवी. इथल्या व्यापारी लुटीवर, सावकारी व्यवस्थेवर आणि कायमच्या अवर्षणावर मात करण्यासाठी 'सहकार' हा त्यांना रामबाण उपाय दिसू लागला. परंतु दारिद्र्य, अंधश्रद्धा, शिक्षणाचा अभाव, पृथक आणि आपपरभावाने लीप्त अशा समाजामध्ये सहकाराचे बिजारीपण करणे अत्यंत कठीण होते. व्यापक हितासाठी आणि समृद्धीसाठी छोट्या-छोट्या फायद्याकडे दुर्लक्ष करुन दुरच्या अरिष्टाचे महत्त्व पटवून देणे कठीण होते. कारण इतक्या दूरदृष्टीची क्षमता इथल्या आडाणी माणसात नव्हती. परंतु विशेष असे की पाटील सांगतात ते बरोबर असेल, असा दृढ विश्वास लोकांना विठ्ठलरावांबद्दल वाटत होता. पाटील विश्वासघात करणार नाहीत. आपल्या

सुखासाठीच ते हे करीत आहेत, ही जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण करण्याइतके विठ्ठलरावांचे व्यक्तिमत्व प्रगल्भ झालेले होते. हा विश्वास त्यांनी अत्यंत पराकोटीच्या प्रतिकुल परिस्थितीतही ढळू दिला नाही. एक उद्यमशील, दुरदृष्टीच्या, व्यापक सामाजिक हिताचा विचार करुन आडाणी, अज्ञानी लोकांच्या मनात उन्नतीचे स्फूल्लीग पेटवून ते सतत तेवत ठेवण्याचे अतुलनीय कसब विठ्ठलरावांनी साध्य केले.

विसावे शतक तसे अनेक घटनांनी गाजले. वैज्ञानिक साधनांच्या उपलब्धतेने माणसाला मिळालेला आत्मविश्वास अहकारापर्यंत जावून, त्याचा विवेक ढळण्यास कारणीभूत होऊ लागला. त्याने निर्माण केलेल्या शस्त्रांचा वापर तो आपल्याच बांधवांना मारण्यासाठी करु लागला. त्यामुळे माणसाचे भावनिक जग पार ढवळून निघाले. हिटलरसारख्या अतिरेकी अहंकारी आणि वंशवादी प्रवृत्तीने जगात उच्छाद मांडला होता. मार्क्सवादाचा भयकारी चेहरा अनुभवाला येत होता. त्याचवेळी भारतात स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले होते. त्यासाठी खेड्यातील शेवटचा माणूस त्यात सहभागी केला पाहिजे; याची जाणीव महात्मा गांधीना झाली होती. टिळकांचे युग संपले होते. मार्क्सवादीची आरोळी भारतात ऐकू लागली होती. याचवेळी सूस, हतबल, हताश, विकल, थंड होऊन पडलेल्या ग्रामीण भागातील माणसाच्या मनात सहकाराची उर्जा भरण्याचे काम विठ्ठलराव करीत होते. हिटलर युरोपात वंशवादाने पेटून माणसांना मारण्याचे फर्मान सोडीत होता. त्याचवेळी विठ्ठलराव माणसांना जागे करुन जगण्याची दिशा देत होते. महात्मा गांधी, टिळक ज्या स्वातंत्र्याची भाषा करीत होते, त्या स्वातंत्र्यासाठी विठ्ठलराव आवश्यक ती अनुकूल ग्रामीण मनोभूमिका तयार करीत होते. जो मार्क्स संपत्तीच्या समान वाटपाचे सूत्र सांगून, समृद्ध जीवनासाठी रक्तरंजित क्रांतीचा मार्ग सूचवित होता; त्यासाठी विठ्ठलराव सहकाराचा आणि रक्तविहीन क्रांतीद्वारे समाजपरिवर्तनाचा मार्ग दाखवित होते. सरंजामशाही व्यवस्थेत दबलेल्या भारतीय जीवनाला पुढे येणाऱ्या लोकशाहीचे तत्व सहकारातून शिकवत होते. जगण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. प्रत्येकाच्या अस्तित्वाची दखल प्रत्येकाने घ्यावी. समुहाशिवाय आपल्या अस्तित्वालाही अर्थ नाही आणि सामुहिक प्रत्यनशिवाय स्वत:चीही उन्नती नाही. असा समुहभाव निर्माण करण्यासाठी आहोरात्र झटत होते. जगात मारण्याची भाषा चाललेली असताना विठ्ठलराव जीवनाची आणि तीही समृद्ध जीवनाची भाषा शिकवीत होते. ते एका ध्येयाने वेडे झाले होते. म्हणनूच कारखान्याचे शेअर्स गोळा करताना बेलापूरच्या पेठेत वेडा विठ्ठलराव म्हणनू त्यांना हिणवले, तरी त्यांची त्यांना क्षिती वाटत नव्हती. कारण प्रवाहाच्या विरुद्ध चालण्याचे वेड समुहाला वळण देणारे ठरणारे होते. रुढ वाटेने चालण्यातील आत्मघात आणि आत्मोन्नतीचा नवा मार्ग, यात आत्मोन्नतीचा नवा मार्ग युगप्रवर्तक नेत्याला खुणावीत होता. त्यासाठी मोडून पडलेल्या, चैतन्यहीन, दारिद्री, अज्ञानी, सामान्य माणसाच्या मनात अत्मिक उत्थानासाठी हा लोकनेता नव्या जीवनाचे बिजांकुरण करीत होता. त्याचा पहिला हुंकार १७ डिसेंबर १९४५ रोजी बेलापूरच्या बागायतदार परिषदेत विठ्ठलरावांनी उच्चरवाने या जनतेला ऐकवला. त्यात हजारो शोषित, पीडित, अस्तित्वहीन माणसांनी आवाज भरला. प्रवरा परिसरात नव्या जीवनाची द्वाही विठ्ंलरावांनी अशा प्रतिकुल परिस्थिती फिरविली. अर्थात त्यासाठी नामोहरम करुन छिद्रांन्वेषी लोकांच्या प्रयत्नांना फिके पाडीत, स्वप्नवत वाटणाऱ्या या स्वप्नाला १९५० मध्ये मूर्त रुप मिळाले. प्रवरा सहकारी साखर कारखान्यातून शुभ्र दाणेदार साखर तयार झाली आणि शोषितांच्या अत्मिक उत्थानाने एक नवे पर्व भोरतात सुरु झाले. त्याचे कुशल संघटक कर्मवीर विठ्ठलराव विखे पाटील होते.

।।२।।

स्थितीशील समाजाला गतीमान करून विकासाची योग्य दिशा देणे हे युगप्रवर्तनाचे कार्य असते. इतिहासात अशा अनेक महान विभूतींनी त्या-त्या वेळच्या गांजलेल्या समाजाला नवी दिशा देऊन, समाजजीवन अधिकाधिक उन्नत करण्याचा प्रयत्न केला. याच परंपरेत पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांचे नाव घेता येईल.

विठ्ठलरावांचा जन्म १२ ऑगस्ट १८९७ (नारळी पोर्णिमा) रोजी लोणी बु.।। या छोट्याशा गावातील सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. शेती हा सगळ्या ग्रामीण समाजाचा मुख्य आधार. तोच त्यांचा जीवनधर्म. जगण्याची सारी रीत शेतीशीच जोडलेली. रात्रंदिवस शेतीत राबून धान्य उत्पादन करणं आणि स्वत:बरोबरच इतर समाजालाही ते पुरवणं हा इथला मुख्य व्यवसाय. त्यामुळे औपचारिक पुस्तकी शिक्षण घेणं ही त्यावेळची पध्दतच नव्हती. तरीही त्यांचे तिसरी पर्यंत शिक्षण झाले होते. अर्थात हे शिक्षणही अक्षरांच्या ओळखीपुरतेच मर्यादित असणार. कारण कुणब्यांना शिक्षणाची काय गरज? लिहिण्या वाचण्यापुरते अक्षरज्ञान असले की पुरे, ही धारणा. परंतु विठ्ठलरावांना व्यावहारिक आणि जीवनाविषयक शहाणपण उपजतच होते. आणि भोवतालच्या परिस्थितीच्या आकलनातून ते अधिकाधिक ठळक होत गेले असावे. विठ्ठलरावांचे वडील हे धार्मिक वृत्तीचे. नेकीने शेती करावी, चार माणसात जबाबदारीने वागावे आणि उर्वरित वेळात पोथीवाचन करून आत्मिक मन:शांती मिळवावी हा त्यांचा नित्यनेम.

विठ्ठलराव आणि शंकरराव असे दोघे भाऊ. दोघांचा एकमेकांवर प्रचंड जीव. विठ्ठलरावांनी शाळा सोडल्यानंतर दोघे ही शेताकडे वळले. शेती हाच आपला जीवनधर्म हे कोणत्याही शेतकऱ्याच्या मुलाला सांगावे लागत नाही. त्यामुळे ती मन लावून केली म्हणजे आपल्या घराला स्थिरता आणि तारूण्याला जोखीम मिळते हा इथला विचार. असा दोघा भावांचा चाललेला संसार बहुतेक नियतीला मान्य नसावा. शंकररावांचं अकाली निधन झालं आणि विठ्ठलराव अक्षरश: उघड्यावर आले. ज्याच्या खांद्यावर मान टाकून खुशाल विसंबावे अशी जागा हिरावली गेल्यामुळे विठ्ठलरावांचं मन संसारातून उडू लागले. कशातच मन रमेना. आपण कशाचेच मालक नसतो. कोणतीच गोष्ट केवळ आपल्याच अधिपत्याखाली घडत नाही. आणि असं जर होणार असेल तर जगण्यात अर्थच काय? अशा विरागी विचारांचे त्यांच्या मनात काहूर माजू लागले. आपण सन्यास घ्यावा असे त्यांना वाटू लागले. परंतु त्यासाठी घरातून परवानगी मिळेना. दरम्यान १९२३ साली विठ्ठलरावांच्या वडिलांचेही निधन झाले. काळाने त्यांच्यावर पुन्हा एक घाव घातला. त्यामुळे संन्यास घेण्याच्या हट्टापासून ते परावृत्त झाले. घरात कर्ता पुरूष राहिला नसतानाच्या स्थितीत मीही घर सोडले तर ते रणावरून पळणाऱ्या सैन्यासारखे ठरले, असे त्यांना वाटू लागलं. अशावेळी खंबीरपणे पाय रोवून उभं राहिल्याशिवाय पर्याय नाही याची त्यांना जाणीव झाली.

हळूहळू विठ्ठलरावांचं रूपांतर जबाबदार कर्त्यापुरूषात झालं. कोट-पागोटं घालून, बारक्या सारंगी घोडीवरून दुडक्या चालीने फिरणाऱ्या, संकटातील शेतकऱ्यांच्या मदतीला धावून जाणाऱ्या पाटलाची बटुमुर्ती पंचक्रोशित सर्वांच्या परिचयाची होऊ लागली. गावची पाटीलकी विखे घराण्याकडे असल्यामुळे गावात आणि आजूबाजूलाही त्यांना 'पाटील' म्हणूनच ओळखीत. घरात त्यांना सगळे 'आप्पा' म्हणत. अर्थात विठ्ठरावांचं वागणं-बोलणं इतकं आपुलकीचं की 'पाटील' शब्दही दुरचा वाटावा. म्हणून परिचित लोक त्यांना 'आप्पा' नावानेच ओळखीत. आप्पांची स्वारी निघाली म्हणजे गावासह पंचक्रोशितील लोकांना आधाराचा, सहानुभूतीचा, मदतीचा आणि विश्वासाचा आधारवड वाटत असे. ते केवळ भटकंती करीत नव्हते, तर ते समाजाचे वाचन आणि निरीक्षण करीत होते. त्यातून त्यांना समाजाच्या स्थितीचे आकलन होत होते.

ते म्हणत ''सावकाराकडून कर्ज काढू नका, जमिनी गहाण टाकू नका, कर्ज काढून सोंगाढोंगात लग्न करून नका, पोरांना शिकवा, काळ्या आईकडे (शेतीकडे) लक्ष द्या'' असं सांगताना कधी कधी न रहावून जरा वरच्या आवाजात पण बेंबींच्या देठापासून आणि अत्यंत तळमळीने म्हणत, ''गाडवीच्यांनो जरा आपली काळी आई नीट सांभाला ! तिची सेवा करा, घाम गाळा, आळस सोडा, बघा आई कशी प्रसन्न होते आणि मन भरून दान देते. सणावार, लग्न, जत्रा यामध्ये उघळमाधळ करण्याचे थेर थांबवा'' यातून त्यांचा संताप दिसत असला तरी विठ्ठलराव आपल्याच हिताचे बोलताहेत ते आपण समजून घेतलं पाहिजे हे लोकांच्या लक्षात येऊ लागले. विठ्ठलराव जे सांगतात त्यात सत्य आहे. आपल्या भल्याची चिंता आहे. हे लोकांनाही कळू लागले. याचे आणखी कारण म्हणजे आप्पांच्या खिशात वेगवेगळ्या रोगांवरील औषधांच्या जडीबुटीही असायच्या. कोणत्याही घरात एखादा माणूस आजारी असला की त्याचा हात धरून नाडीपरीक्षा करून त्याला योग्य उपचार सांगत. त्यामुळे अडचणीतील लोकांना विठ्ठलरावांचा मोठा आधार वाटे.

विसावे शतक अनेक भल्या-बुऱ्या घटनांनी भरलेले आहे. इंग्रजी सत्तेचा सूर्य जगात तळपत होता. त्यात हिंदुस्थानही त्यांची एक वसाहत. या काळात हिंदुस्थानातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवन अक्षरश: काळवंडून गेलेले होते. पेशवाईतील कर्मठ धार्मिक संकेत आणि नीती-नियमांनी समाजजीवन कुंठीत झाले होते. दैन्य, दारिद्र्य , अंधश्रध्दा अज्ञात यामुळे समाज परावलंबी, दैववादी, स्थितीशील पराभूत आणि गुलामी मानसिकतेने जखडून गेलेला होता. त्यातच १८७६-७७ पासून सतत पडणारे दुष्काळ आणि दुसऱ्या बाजूला जुलमी इंग्रजी सत्ता यामुळे तर उरले सुरले अवसानही गळून पडले होते. दुष्काळाला जोडून येणाऱ्या दारिद्र्याचा फायदा धनदांडगे सावकार उठवीत होते. त्यामुळे शेतकरी भूकेकंगाल आणि सावकार गलेलठ्ठ अशी ग्रामीण परिसराची दयनीय अवस्था होती.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात लोकमान्य टिळक हे राष्ट्रीय स्तरावर भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेते म्हणून तळपत होते. इंग्रजी सत्तेला ते जाहीर आव्हान देत होते. भारताला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, तो आमचा हक्क आहे हा विचार ते जनमानसात रूजवू पाहत होते. त्याच वेळी त्यांचे परम् मित्र गो. ग. आगरकर मात्र राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक स्वातंत्र्याची आवश्यकता पटवून देत होते. त्यांच्या मते सामाजिक सुधारणा होण्यापूर्वीच मिळालेले स्वातंत्र्य आपल्याला टिकवता येणार नाही. हा त्यांचा विचार मूलभूत असला तरी खूप दूरचा असल्यामुळे टिळक पंथियांना पटणारा नव्हता. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील दोन प्रवाह रूढ झाले. एक राजकीय स्वातंत्र्याचा आग्रह धरणारा आणि दुसरा सामाजिक स्वातंत्र्याच्या आवश्यकतेवर भर देणारा १९२० ला टिळकांच निधन झाल्यानंतर स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व म. गांधींकडे आले. तत्पूर्वी आपल्या गुरूवर्यांच्या आदेशावरून ते भारत भ्रमण करीत होते. त्यानंतर त्यांच्या हे लक्षात आले की परावलंबी झालेला आणि हजारो खेड्या-पाड्यातून पसरलेल्या अज्ञानी समाजाला चळवळीत सहभागी केल्याशिवाय भारताला स्वातंत्र्य मिळू शकत नाही. त्यासाठी त्यांनी

शहरवासीयांना खेड्याकडे चला' अशी हाक दिली. दांडी यात्रा काढून ग्रामीण, दारिद्री, अज्ञानी, पराभूत ग्रामीण समाजाला जागं करण्याचा प्रयत्न सुरू झाला. परंतु ग्रामीण समाजातील परिवर्तनासाठी अनुकूल मानसिकता घडविण्याचे मूलभूत कार्य अनेक समाज सुधारक आपापल्या पातळीवर राहून आत्मीयतेने करीत होते. त्यात विठ्ठलरावांचाही समावेश होता.

शेती करीत असतानाच विठ्ठलरावांना वाचनाचा छंद जडला गावात बारामहीने मंदिरामध्ये बाबुराव भटजीचे पोथीवाचन चालू असे. विठ्ठलराव याचे प्रमुख श्रोते. याशिवाय दररोजचे वर्तमानपत्रही ते आवर्जून वाचीत . त्यांच्या कोट्याच्या खिशात कायम केसरीचा अंक असे. या वाचनाचा त्यांच्या मनावर गहिरा परिणाम होत होता. जातीपातीवरून कोणाला वागणुक देताना पाहिलं की त्यांना भयंकर चीड येई. अस्पृश्याला पाणी पाजायचं असल्यास त्याच्या ओंजळीत पाणी ओतलं जाण्याचं दृश्य दिसलं की ते माठ्याने ओरडत... '' पेला दे, नाहीतर गडवा दे.... अक्कल गहाण पडली का तुझी? तो काय मानूस नाही?'' आजूबाजूला जातीवरून शिवाशिव अखंड पाळली जात असताना त्याला ठणकावून विरोध करण्याची त्यांची हिम्मत सगळ्यांना वेगळी वाटत होती.

त्या काळात स्वत:ची जमीन असलेला शेतकरी म्हणजे स्वत:च्या शेतीवरचा मजुरच. फक्त जमीन आपल्या मालकीची हाच तेवढा त्याच्या आधाराचा भाग. जमीन नांगरण्यापासून ते सुगीपर्यंत सारे शेतकरी शेतावरच राबत. अशावेळी ऐकेकटा राबला तर कामाचा उरक वाढत नाही म्हणून 'इर्जिक' जाण्याची परंपरा होती. ''एकमेका साहय करू अवघे धरू सुपंथ'' या उक्तीचे ते मूर्त रूप होते. या इर्जिकच्या प्रथेतून विठ्ठलरावांच्या मनात नवे विचार घोळू लागले. शेतकरी जर एकत्र शेती करू शकतात तर असेच गरीब शेतकरी अधिक वेगळ्या पातळीवर एकत्र आले तर आपण प्रतिकूल परिस्थितीवर मात करू शकतो. या विचारातून त्यांच्या मनात सहकाराचे बिजारोपण होऊ लागले.

प्रथमत: त्यांनी सावकारांविरोधात लढा उभारण्याचे ठरवले. १९०२ च्या सहकाराच्या कायद्यानुसार सहकारी संस्थांच्या उभारणीची प्रक्रिया सुरू झाली होती. पण त्याचा प्रत्यक्ष अविष्कार दिसत नव्हता. जिथे कुठे असे प्रयत्न होत होते ते सरकारी अनास्थेमुळे आणि प्रस्थापितांच्या दबावामुळे हाणून पाडले जात होते. अशावेळी दि. २३ जानेवारी २९२३ रोजी लोणी बु. येथील सहकारी पतपेढीला नवसंजीवनी दिली. इथूनच विठ्ठलरावांच्या सहकारी चळवळीचा श्रीगणेशा झाला. गरीब शेतकऱ्यांना त्यात सभासद करून घेतले. त्यांना खते पुरवणे, गाई, बैल घेण्यासाठी कर्ज देणे, पेंड देणे, तसेच आगंतुक खर्चासाठी मदत करणे अशा नित्याच्या गरजा या पतपेढीद्वारे भागविल्या जावू लागल्या. शेतकऱ्यांना शेतीसाठी सावकारापुढे हात पसरण्याची गरज उरली नाही. कर्जाची वसुलीही नियमा आधारे, बिनचूक, सवलतीत होऊ लागली. त्यातून त्याचा आत्मसन्मान जपला जावू लागला. सावकारापुढे मान खाली घालून चालण्याची त्याला गरज राहिली नाही. यातून त्याचा सन्मान जपला जाऊ लागल्यामुळे लोकांमध्ये थोडी हिम्मत आली आणि स्वत:च्या जीवनाबद्दल आत्मविश्वास वाटू लागला. विठ्ठलरावांनी सुरू केलेले हे काम, ही खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या आत्मसन्मानाची मुहर्तमेढ होती. त्यानंतरच विठ्ठलरावांच्या विचारांना नव्या कल्पनांचे घुमारे फुटायला सुरूवात झाली

१९२६-२७ च्या दरम्यान विल्सन डॅमचे (भंडारदरा) काम पूर्ण होऊन प्रवरा नदीतील पाणी पाटाद्वारे दुष्काळी भागातील काळ्या-कसदार जमिनीवरून खळखळू लागले. परंतु त्याचा फायदा गरीब शेतकऱ्यांना घेता येत नव्हता.हे पाणी खाजगी साखर कारखाने व बड्या शेतकऱ्यांसाठीच राखीव होते. धरणाचा खर्च भरून काढायचा म्हणून खाजगी भांडवलदारांना जमीन देवून साखर कारखाना काढायला प्रोत्साहन देण्याचे सरकारी धोरण होते. सरकारने मुंबईच्या मेसर्स डब्लू.एच.ब्रांडी ॲण्ड कंपनी या युरोपीयन भांडवलदार कंपनीला अहमदनगर जिल्हयात बोलावून तिला कालव्याखाली येणारी बेलापूर परिसरातील शेतकऱ्यांची ७३६७ एकर जमीन दीर्घ मुदतीच्या लीजवर संपादित करून दिली. पुढे श्री. बी.एस.कामत यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीनेही याच पध्दतीच्या शिफारशी केल्या होत्या. पहिल्या महायुध्दाच्या काळात साखरेची टंचाई निर्माण झाली होती. त्यावर मात करण्यासाठी ब्रिटीशांनी साखर उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न सुरू केले होते. त्यासाठी युरोपीय तसेच देशी खाजगी उद्योगांना खास सवलती देऊन प्रोत्साहन देण्याचे धोरण राबविले जात होते. त्यातूनच हरेगाव, टिळकनगर, माळीनगर, कोपरगाव येथे खाजगी साखर कारखाने उभे राहू लागले होते. परंतु हजारो गरीब लहान शेतकऱ्यांच्या जमिनी हासडून कारखानदारांच्या घशात घालण्याचे पापकर्म सरकार स्वत:हून करीत हाते. त्यामुळे गरीब शेतकरी अक्षरश: रस्त्यावर येऊ लागला. पण याकडे कुणाचेही लक्ष नव्हते. ही गोष्ट विठ्ठलरावांना सारखी सलत होती.

यापूर्वी शेतकरी ऊस पिकवित होते, त्यांचा गूळ केला जात होता. धरणाच्या पाण्यामुळे आणि विहीर बागायतीमुळे ऊसाचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे बाजारात गुळाची आवक वाढू लागली. परंतु तिथेही व्यापारी शेतकऱ्यांना छळीत होते. पडीच्या भावात गूळ खरेदी करून पुन्हा हा शेतकरी नागवला जात होता. दुष्काळ, रोगराई, टोळधाडी, सावकारशाही, व्यापारी, दलाल, आणि प्रतिकूल निसर्ग अशा चहुबाजूंनी शेतकरी भरडला जात होता. त्यातच लोणीचा 'लगड' नावाचा शेतकरी आपला

गूळ घेऊन बेलापूरच्या पेठेत विकण्यासाठी घेऊन गेला. त्याच्या गुळाला इतका कमी भाव मिळाला की त्याला त्याचा प्रचंड धक्का बसला. माघारी येताना बसल्या गाडीत तो बेशुध्द झाला आणि त्यातच मरण पावला. बैल घराच्या ओढीने नेहमीच्या गाडी रस्त्याने गावात आले. तेव्हा त्या शेतकऱ्याचा मृतदेह गाडीत पडलेला गावातील लोकांना दिसला. या घटनेने विठ्ठलराव सून्न झाले. काय करावे ते कळत नव्हते, मात्र काही तरी केले पाहिजे या विचाराने ते अस्वस्थ झाले.

दरम्यान विठ्ठलरावांनी लोणी आणि परिसरात ज्या अनेक पतपेढ्या सुरू केल्या होत्या, त्यांना कारभाराची दिशा दिली. सहकाराचे महत्त्व पटवून दिले. आपण एक राहिलो, नेक राहिलो तर फायदा आपलाच आहे. आपल्याच संसाराला, लेकराबाळांना चांगले दिवस पहायला मिळतील. ताठ मानेनं जगता येईल. कुणापुढे भीक मागायची गरज पडणार नाही. त्यामुळे लोकांनीही भूरपूर प्रतिसाद दिला. अगदी ते सांगतील त्या पध्दतीने वैयक्तिक जीवनात आणि संस्थात्मक जीवनातही वागू लागले. एकमेकांबद्दलचे सहानुभावाचे सहकार्याचे एकमेकांच्या प्रतिष्ठेचे वारे सळसळू लागले. पण प्रश्न संपलेले नव्हतेच. लगड शेतकऱ्याच्या मृत्यूने ते अधिक गडद झाले होते. तेव्हा विठ्ठलरावांच्या मनात विचार आला की खाजगी भांडवलदार जर साखर कारखाना काढू शकतात, तर आपण सकळ्या गरीब शेतकऱ्यांनी एकत्र येऊन असा स्वत:च्या मालकीचा साखर कारखाना का काढू नये? हा विचार मनात येण्याच्या पाठीमागे पतपेढ्यांनी निर्माण केलेले जाळे त्यांच्या मनाभोवती होते हे महत्त्वाचे. याच वातावरणात १७ डिसेंबर १९४५ रोजी बेलापूर येथे बागाईतदार शेतकऱ्यांची परिषद धनंजयराव गाडगीळांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली होती. या परिषदेत छोट्या शेतकऱ्यांचा सहकारी साखर कारखाना सुरू करायचा आहे. यासाठी कोण पुढाकार घेईल असे आवाहन करण्यात आले. या अवाहनाला प्रतिसाद देताना विठ्ठलरावांनी भरसभेत '' मी हे आव्हान स्वीकारतो'' असे ठणकावून सांगितले. तेव्हा तिथे असलेल्या सगळ्यांनाच हे डोक्यावर डोंगर घेण्यासारखे वाटले होते. विठ्ठलरावांनाच्या या धाडसाचं विद्यमान आमदार गिरमे आणि गाडगीळांनांही कौतुक केले आणि विठ्ठलरावबद्दल त्यांना आदर वाटला पण अनेकांना हास्यास्पद आणि बावळटपणाही वाटला. परंतु हाच क्षण एका नव्या युगप्रवर्तनाचा साक्षीदार होता हे आज लक्षात येते. बाळासाहेब विखेपाटील म्हणतात तेव्हा मी चौदा वर्षाचा असेल. मला काही कळत नव्हतं पर त्या दिवशी आप्पांच्या अंगात मला वेगळंच तेज संचारल्यासारखे दिसत होत. गावातील लोक भीतीयुक्त कौतुकभरल्या नजरांनी विचारपूस करीत होते. हे काम सोपे नाही असे विठ्ठलरावांवर विश्वास असलेल्यांनाही वाटत होते. विठ्ठलराव या विचाराने भारावलेले होते.

याच दरम्यान सासवडच्या माळी कंपनीने बेलापूर परिसरात शेतकऱ्यांसाठी साखर कारखाना उभा करण्याची धडपड सुरू केली होती. बेलापूरच्या बाजारात 'जॉगरी किंग' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शोभाचंद खटोड या व्यापाऱ्यानेही स्वत:चा खाजगी कारखाना काढण्याची खटपट सुरू केली होती. हे कारखाने उभे राहिले म्हणजे गोरगरीब शेतकरी भूमीहीन होऊन देशोधडीला लागणार होता. त्यामुळे विठ्ठलराव अधिक चिंतीत होते. म्हणूनच त्यांनी या कामाला अधिक गती देण्याचे ठरविले.

हा काळ त्यांच्या जीवनातील अत्यंत कसोटीचा होता. अज्ञानी, दरिद्री, पराभूत ग्रामीण शेतकऱ्यांमध्ये सहकारी पतपेढ्यांच्या माध्यमातून काही प्रमाणात चैतन्य आणण्याचे काम त्यांनी केले होते. पण सहकारी तत्वावर थेट साखर कारखाना काढणे हे या साध्या-भोळ्या लोकांना अनाकलनीय आणि अशक्य कोटीतील वाटत होती. गावपातळीवर पतपेढ्या काढणे ठीक, पण थेट भांडवलदारांशी बरोबरी करून स्वत:च्या मालकीचा कारखाना उभा करणे हे स्वर्ग पाताळ एक करण्यासारखीच होते. परंतु लोकांचा एक भरवसा होता की, ''विखे पाटील म्हणतात यात काहीतरी तथ्य असलंच पाहिजे! आणि ते जे म्हणतील त्यावर आपण विश्वास ठेवलाच पाहिजे! काय जे व्हांयचं असेल ते होऊ द्या ! आपण कशाला चिंता करायची? काय ते विखे पाटील पाहून घेतील ! आपण ते म्हणतात तेवढं करीत राहा.'' हा त्यांचा विचार विठ्ठलरावांना प्रेरणा देत होता.

असे जरी असले तरी काही प्रस्थापित लोक विठ्ठरावांवरील लोकांच्या या विश्वासाला तडा देत होते. ''कारखाना काढणं हा काय बाजारचा भाजीपाला आहे का? हे दगडावर डोकं आपटण्यासारखेच आहे. हे वाणी, शेठ-सावकरांचे काम. आपल्या कुणब्यांनी मातीतच गाडावं. कशाला उंटाचा मुका घ्यावा. हे कोरड्या विहिरीत उडी घेण्यासारखंच आहे.'' अशा प्रकारच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. त्यामुळे परिसरात काहीसं संशयाचं वातावरण तयार होत होतं पण विठ्ठलरावांच्या व्यक्तिमत्त्वाच्या वलयांपुढे या अपप्रचाराचा प्रभाव वाढत नव्हता. भल्या पहाटे उठणे फडक्यात भाकरी बांधून कोटाच्या खिशात घालून लोकांना कारखान्याची कल्पना समजावून सांगणे, शेअर्स गोळा करणे, ते बँकेत भरणे, सरकार दरबारी अर्ज विनंती करणे, मंजुऱ्या मिळवणे, त्यासाठी सतत याला भेट त्याला भेट, सचिव, मंत्री, अधिकारी यांचे उंबरे झिजवणे, मनिशरी कोणती घ्यायची? कोणत्या कंपनीची घ्यायची?, कोठून घ्यायची?, कशी आणायची?, पैशाची काय व्यवस्था करायची?, जागा कोणती? इंजिनिअर, अधिकारी, कुशल कामगार, मजूर अशा एका ना हजार भानगडीमध्ये विठ्ठलराव दिवसरात्र बुडून गेलेले असायचे. समाजाचा संसार हाकताना स्वत:च्या संसाराची त्यांना तमा नव्हती केवळ माझा संसार उत्तम होऊन चालणार नाही. सगळा समाज सुखी झाला म्हणजे आपोआप मलाही आनंद मिळेल ही त्यांची धारणा.

कारखान्याचे शेअर्स विकताना विठ्ठलरावांनी काही नियम केले होते. त्यातून दूरदृष्टी आणि सर्वसमावेशकता जी सहकारात अनुत्सुत असते ती स्पष्टपणे दिसून येते. एक शेअर्स तीनशे रूपयांचा आणि एका एकराला एक शेअर्स विकायचे. मात्र पंचवीस शेअर्सपेक्षा जास्त शेअर्स एकाच व्यक्तीला द्यायचे नाहीत यामागची त्यांची स्पष्ट भूमिका होती. ''हा गरीब शेतकऱ्यांचा कारखाना आहे, श्रीमंतांचा नाही. मला माणसं पाहिजे केवळ पैसे नकोत.'' गरीब शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये आणि त्यांना या कारखान्यात अवघडल्यासारखेही वाटू नये ही त्यांची भूमिका होती. अन्यथा एकरकमी ठोक शेअर्स घेणारे शेठ सावकारही त्यांना सहज मिळाले असते. पण तिथे गरीब शेतकऱ्यांना सन्मान मिळाला नसता. ही त्यांची उदार भूमिका समाज परिवर्तनाची आणि ग्रामोन्नतीची होती हे लक्षात घेतले पाहिजे.

दरम्यान सरकारकडून कारखान्याची नोंदणी रजिस्टर करण्यात दिरंगाई झाल्यामुळे विरोधकांच्या हातात आयते कोलीत मिळाले. त्यांनी ''पाटलांचे शेअर्स घेऊ नका, तो लबाड माणूस हाये, तो काय कारखाना काढणार? त्याच्या नादाला लागून फसाल, पैसे दिले असतील तर वेळीच परत मागा, नाहीतर पस्तवाल!'' अशा अफवा पसरवून शेतकऱ्यांना भडकून द्यायला सुरूवात झाली पण विठ्ठलराव किंचितही डगमगले नाहीत.

या कोंडीतून वाट काढण्यासाठी वैकुंठराय मेहता व अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ यांनी मोलाची मदत केली. दोघेही सहकाराचे समर्थक आणि गरीब शेतकऱ्यांची कणव असलेले जाणते नेते. तत्कालीन मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांच्या मंत्रीमंडळात वैकुंठभाई सहकार मंत्री होते. अर्थतज्ज्ञ म्हणून धनंजयराव गाडगीळांचा सरकारदरबारी दबदबा होता. या दोघांच्या एकत्रित प्रयत्नातून कारखान्याला सरकारची रितसर परवानगी मिळाली.

२ सप्टेंबर १९४९ रोजी डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली भूताच्या माळावर शेतकऱ्यांची पहिली सभा झाली. सर्वांच्या साक्षीने पाचशे टन गळीताची क्षमता असलेला कारखाना उभारण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले. मुख्य प्रवर्तक म्हणून विठ्ठलराव विखे पाटील यांच्या नावाची घोषणा झाली. तिथेच आप्पांनी धनंजयराव गाडगीळांची कारखान्याचे चेअरमन म्हणून निवड केली. अर्थात त्यासाठी विठ्ठलरावांनी कारखान्याचे व्हाईस चेअरमन व्हावे अशी अट धनंजयरावांनी घातली होती. कारखान्याच्या उभारणीमध्ये विठ्ठलराव रात्रंदिवस कामात बुडून गेले होते. 'योग्य जागी योग्य माणूस' हे कर्मचारी नेमणूकीत सूत्र ठेवले होते अधिकाऱ्यांची गुणवत्ता हेरून त्याचा योग्य उपयोग कसा करून घेता येईल ते पाहत. ते एका विशाल सहकारी तत्वावर आधारलेल्या परिवाराचे आश्वासक कर्ते पुरूष झाले होते. त्यातील भल्या-बुऱ्याची जबाबदारी त्यांच्यावरच येणार होती.ही पक्की जाणीव त्यांना असल्यामुळे ते सतत डोळ्यात तेल घालून ते काम करीत होते.

त्यांच्या प्रयत्नाला एक दिवस यश आले. दि. २३ डिसेंबर १९५० रोजी भूताच्या माळावर (आजचा कारखान्याचा परिसर) अजस्त्र मशिनरी धडधडू लागल्या. एका अर्थाने ते भूतांचेच धडधडणे होते, पण ते मानवतेच्या कल्याणासाठी होते. नव्या युगाचा मंत्रघोष करणारे होते. नव्या युगाचे गाणे गाणारे होते. गरीबांच्या दरिद्री संसारात नवी वीणा झंकारली होती. शेकडो वर्ष अंधारात चाचपडणाऱ्या अज्ञानी लोकांच्या अत्मसन्मानाचा तो चमत्कार होता. दुबळ्या शेतकऱ्यांच्या डोळ्यात अंधाराची पायवाट प्रकाशमान झाली होती. त्याचाच पुढे हमरस्ता होणार होता. विठ्ठलरावांनी पाहिलेले एक फार मोठे स्वप्न त्या दिवशी पूर्ण झाले. दाणेदार शुभ्र रंगाची साखर पोत्यात खळखळू लागली.

आर्थिक स्थिरता मिळाल्यानंतर प्रवरा परिसरात नवे वारे वाहू लागले. पराभूत, गुलाम मानसिकतेतून गरीब शेतकरी बाहेर आला. त्याच्यात आत्मविश्वास आला. आपणही काहीतरी करू शकतो. नवे मन्वंतर घडवून आणू शकतो. एकत्र आलो तर अशक्य वाटणारे कोणतेही स्वप्न वास्तवात आणू शकतो हा विश्वास नव्या ग्रामीण भारताला या प्रयत्नातून मिळाला. समाजाचा अंतिम घटक विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये सामील होण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यांचा आत्मसन्मान जागृत झाला. वर्षानुवर्षे दारिद्र्य, दुःख वेदना अज्ञानाच्या शृंखलांनी जखडलेल्या ग्रामीण समाजाला आपल्या आर्थिक सामाजिक स्वातंत्र्याची वाट दिसू लागली.

विकासाचे चक्र गतीमान होऊन आधुनिक ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासाचे 'रोल मॉडेल' म्हणून 'प्रवरा सहकारी साखर कारखान्या'चा पुढे स्वीकार झाला त्यामागे विठ्ठलरावांचे हे युगप्रवर्तनाचे कार्य होते. या कारखान्यामुळे कृषी उद्योगावर आधारीत अर्थरचनेतून नवमहाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा पाया रचला गेला. याचे श्रेय विठ्ठलरावांचे आहे.

सहकारी कारखान्याच्या उभारणीनंतर विठ्ठलरावांनी परिसरात कृषिपूरक उत्पादनाचे अनेक प्रकल्प सहकारी तत्वावर सुरू केले. शेती संशोधन व प्रात्यक्षिक केंद्र, माती परीक्षण, संकरीत पशू पैदास केंद्र, दुग्ध व्यवसाय मार्गदर्शन केंद्र, उपसा जलसिंचन योजना, जिरायत दुष्काळी पाणी पुरवठा योजना, पाझर तलाव, सामुदायिक विहिरी, प्रवरा पब्लिक स्कूल, प्रवरा कन्या विद्या मंदिर, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, प्रवरा शिक्षणोत्तेजक सोसायटी, प्रवरा मेडिकल ट्रस्ट, प्रवरा सहकारी बँक, कामगार कल्याण

केंद्र यासारख्या लोकोपयोगी संस्था सुरू करून परिसराचा सर्वांगीण विकास कसा होईल याची प्रक्रिया सुरू केली. तसेच आधुनिक ग्रामीण महाराष्ट्रात संस्थात्मक कार्याची मुहुर्तमेढ रोवून ग्रामीण परिवर्तनाची सुरूवात केली.

विठ्ठलरावांनी समाजाच्या आर्थिक प्रगतीबरोबरच सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासालाही दिशा दिली. शिक्षण हे दारिद्र्य निर्मूलनाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. ग्रामीण समाजातील तरूण–तरूणींना सहज सुलभ पध्दतीने शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली तर ते ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देतील व राष्ट्रनिर्मितीमध्ये मोलाचे योगदान देऊ शकतील असे त्यांचे मत होते. हाच विचार डोळ्यासमोर ठेवून त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेला शाळा सुरू करण्यासाठी आर्थिक मदत केली. १९६४ साली प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणाची गंगा ग्रामीण भागातील गोरगरीबांच्या घरापर्यंत पोहचविण्याचे कार्य सुरू केले. केवळ इंग्लिश भाषेच्या अज्ञानामुळे ग्रामीण विद्यार्थी शहरी विद्यार्थ्यांच्या तुलनेत मागे पडतो म्हणून प्रवरानगर येथे 'प्रवरा पब्लिक स्कूलची' स्थापना केली. शेतकरी व कष्टकरी समाजातील मुलांबरोबरच मुलींनाही शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे. आणि इंग्लिश शाळेत शिकलेल्या मुलाला तशीच शिकलेली मुलगी पत्नी म्हणून मिळाली पाहिजे यासाठी प्रवरा कन्या विद्या मंदिरची स्थापना केली. मुलींच्या स्वतंत्र संकुलाची स्थापना करून सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षण कार्याचा वारसा समर्थपणे पुढे नेला. याशिवाय कोणताही गरीब विद्यार्थी शिक्षण घेण्यापासून वंचित राहू नये यासाठी 'कमवा व शिका' ही योजना सुरू केली. त्यातून अनेकांनी आपले आयुष्य शिक्षणाने समृध्द केले.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात आरोग्य व वैद्यकीय सुविधा केवळ श्रीमंत व शहरी समाजालाच उपलब्ध होत होत्या. ग्रामीण भागातील लोकांना चांगली वैद्यकीय मदत मिळू शकत नव्हती. हे लक्षात घेऊन विठ्ठलरावांनी आरोग्य सुधारण्याच्या प्रश्नाकडे लक्ष दिले. त्यांच्या प्रेरणेने १९७५ साली प्रवरा मेडिकलची स्थापना होऊन सर्व सोयींनी युक्त असे आधुनिक रूग्णालय सुरू केले. या रूग्णालयाद्वारे ग्रामीण समाजाला विशेषत: महिला व बालकांना अल्पदरामध्ये वैद्यकीय सेवा उपलब्ध झाली आहे.

सहकारी चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण परिसराचा चेहरामोहरा बदलला. त्यांनी ग्रामीण समाजाच्या नवनिर्मितीसाठी जे मौलिक कार्य केले त्याची दखल घेऊन भारत सरकारने १९६२ मध्ये 'पद्मश्री' हा किताब देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या शुभहस्ते व पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या उपस्थितीत विठ्ठलरावांनी हा मानाचा पुरस्कार स्वीकारला. पुणे विद्यापीठाने २२ ऑक्टोबर १९८७ रोजी 'डी. लिट' ही पदवी देऊ न त्यांचा बहुमान केला. तसेच ४ फेब्रुवारी १९७९ रोजी महात्मा फुले कृषी विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी देऊन त्यांच्या सर्वांगीण कार्याचा सन्मान केला.

कारखान्याच्या औपचारिक उद्घाटनासाठी पंडित नेहरू लोणीला आले होते. या गरिबांच्या पहिल्या सहकारी साखर कारखान्याचे उद्घाटन पंडितजीच्याच हस्ते व्हावे असा विठ्ठल यांचा अट्टाहास होता. तो त्यांनी पूर्ण केला . पंडितजी म्हणाले होते '' विद्वान व श्रीमंत अशी मोठी माणसे मोठे कार्य करतात हे मला माहीत आहे. परंतु कमी शिकलेली लहान माणसे देखील मोठे कार्य करू शकतात. विखे पाटलांसारखा सामान्य शेतकरी मोठे कार्य करू शकतो, हे मी आज पाहिले. श्री. विखे पाटील हे खरे देशभक्त आहेत.'' ही पंडिजीची प्रतिक्रिया फार मोलाची वाटते.

''भारतात पहिला सहकारी साखर कारखाना सुरू करण्याची कामगिरी विखे पाटील यांनी केली. त्यांचा सत्कार करताना मला आनंद होत आहे.'' असे श्रीमती इंदिरा गांधी म्हणाल्या होत्या. अशा थोरांकडून विठ्ठलरावांच्या कार्याचे होणारे कौतुक ग्रामीण महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

## संदर्भ ग्रंथ

१) भूमिपुत्र : राजा मंगळवेढेकर

२) लढत : शिवाजी सावंत : भाग १ व २ पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन, प्रवरानगर दु. आ. २००८

३) The Pioneer : Life and time vitthalrao vikhe patil: Arun Sadhu, Rohan Prints , प्र. आ. २०११

४) सहकार धुरीण : अरूण साधू, रोहन प्रकाशन , पुणे – प.आ. २०१४

५) महामेरू : राजेंद्र वडमारे, मीरा पब्लिकेशन, औरंगाबाद